व्रणोपचारक / परिचर गट ड या पदावरुन पशुधन पर्यवेक्षक गट क या पदावर पदोन्नती देणे बाबत...

जिल्हा परिषद अहिल्यानगर
पशुसंवर्धन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रं/पसं/आस्था-१/२३५/२०२६
अहिल्यानगर – दिनांक खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा-
१. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (भरती ) नियम १९६७ परिशिष्ठ २ (४)
२. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील आदेश क्र.एपीटी/२५३८/सीआर/२५९/१३ दि.२१/०७/१९८३
३. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील आदेश क्र सेप्रनि२०१०/प्र.क्र१३३/आस्था-९ दि.२२ मे २०१०
४. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील आदेश क्र.एपीटी/२०१२/प्र.क्र.१३४/आस्था-९ दि.५ मे २०१२
५. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी/२०१६/प्र.क्र.१९८/ कार्या-१२ दि.१८.६.२०१६
६. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी/२०१७/प्र.क्र.३१२/१६ दि.२९.१२.१७
७. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील पत्र दिनांक १२ नोव्हेंबर २०२१
८. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील पत्र संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०५/आस्था-८ दिनांक ३१ मे २०२२
९. पदोन्नती गठीत निवड समितीचे इतिवृत्त दिनांक ०९/०३/२०२६

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ ते ८ मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषदेतंर्गत सध्या व्रणोपचारक / परिचर गट- ड या पदावर कार्यरत असणा-या कर्मचा-यांस पशुधन पर्यवेक्षक गट क वर्ग-३ या पदावर सुधारीत वेतनस्तर एस-८ रुपये २५५००-८११०० या वेतनश्रेणीत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटींच्या अधिन राहुन रकाना क्रमांक ६ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन पदोन्नतील कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवा जेष्ठतेनुसार भरण्यात येत असल्याने सदरची पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुनच करण्यात येत आहे.

| अ.नं | कर्मचाऱ्याचे नांव | सध्याचे कार्यालय | मुळ प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग ७ मे २०२१ नुसार ( बिंदूविरहीत प्रवर्गातुन देण्यात येत आहे ) | पदोन्नतीने देण्यात येणारे पदस्थापनेचे ठिकाण. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.पादर लक्ष्मण गिताराम व्रणोपचारक | पशुवैदयकीय दवाखाना श्रे-२ ब्राम्हाणी ता.राहुरी | खुला | बिंदु विरहीत प्रवर्ग | पशुवैद्यकीय चिकित्सालय पिंपळगाव माळवी ता. अहिल्यानगर |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | श्री.धोंडू गोविंद खाडगिर<br>परिचर | पशुवैदयकीय दवाखाना<br>श्रे-२ शिरपुंजे ता.अकोले | इ.मा.व. | बिंदु विरहीत<br>प्रवर्ग | पशुवैद्यकीय चिकित्सालय<br>तिरडे<br>ता. अकोले |

<u>पदोन्नतीच्या अटी व शर्ती –</u>

१. सदरची पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या न्यायालयीन निर्णयांच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देणेत येत आहे.
२. सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे पदोन्नतीच्या दिनांकापासून सेवाज्येष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.
३. नेमणुकीच्या ठिकाणी विहीत कालावधीत हजर न झाल्यास तसेच नेमणुकीचे पदस्थापनेत बदल करणेसाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम १९६४ मधील नियम ४ नुसार कारवाई करणेत येईल.
४. पदोन्नतीच्या ठिकाणी ०७ दिवसांत हजर होणे बंधनकारक आहे.
५. सदरची नोंद संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.
६. उमेदवाराने पदोन्नती दिनांकापासुन ४ वर्षाचे कालावधीमध्ये ३ संधीमध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (सेवा प्रवेश) नियम १९८५ व सुधारीत नियम १९९९ नुसार परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.अन्यथा तुम्हाला सेवा जेष्ठता गमवावी लागेल.तसेच वेतनवाढी स्थगीत केल्या जातील.
७. पशुधन पर्यवेक्षक वर्ग-३ या पदासाठी विहीत केलेला जामीन कदबा पदोन्नती पदावर हजर झालेपासुन एक महिन्याचे आत सादर करणे बंधनकारक राहील.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र २०२६०७2७११००32 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 22-07-2026 21:43:30
( आनंद भंडारी भाप्रसे )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- गट विकास अधिकारी, पं.स. राहुरी / अहिल्यानगर / अकोले
२/- उपरोक्त आदेशातील कर्मचारी यांना पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होणेकामी तात्काळ कार्यमुक्त करावे तसेच त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Scanned with OKEN Scanner